सन २०१५-१६ या वर्षासाठी महसूल विभागातील मंडळ अधिकारी व तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता या बाबींसाठी माहे जुलै, २०१५ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला निधी वितरीत करणेबाबत..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः पुरवणी-२०१४/प्र.क्र.४८१/ई-१०

मंत्रालय (मुख्य इमारत), १ला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक : ५ फेब्रुवारी, २०१६

वाचा :

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-प्रभ-२०१२/प्र.क्र.३१७/ई-१०, दिनांक २१ नोव्हेंबर,२०१४.
२) शासन शुध्दीपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक. प्रभ-२०१२/प्र.क्र.३१७/ई-१०, दिनांक १५ सप्टेंबर, २०१५.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक.पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प-३, दिनांक १ ऑगस्ट, २०१५.
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक.पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/ब-१, दिनांक ३ ऑगस्ट, २०१५.

प्रस्तावना :

संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक १ अन्वये महसूल विभागातील मंडळ अधिकारी व तलाठी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना रक्कम रु.१२७५/- इतका कायम प्रवास भत्ता (दैनिक भत्त्यासह) दरमहा दिनांक १ सप्टेंबर, २०१४ पासून लागू करण्यात आला आहे. सदर कायम प्रवास भत्ता दिनांक १ सप्टेबर, २०१४ पासून मंजूर करण्यात आला असल्यामुळे सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये (दिनांक १ सप्टेंबर, २०१४ ते ३१ मार्च, २०१६) वेतनासोबत सदर भत्ता अदा करण्याकरीता चालू वित्तीय वर्षात रु.३६,००,०७,७२५/- एवढया निधीची आश्यकता होती. त्यानुसार जुलै, २०१५ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये रु.३६,००,०७,०००/- (अक्षरी रुपये छत्तीस कोटी सात हजार फक्त) इतक्या रकमेची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती. सदर पुरवणी मागणी मान्य करण्यात आलेली असल्याने वित्त विभागाच्या संदर्भाधिन दिनांक ०१/०८/२०१५ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार सदर निधी सन

२०१५-१६ च्या आर्थिक वर्षात बी.डी.एस.प्रणालीवर वितरित करण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली असता वित्त विभागाने सदरहू प्रयोजनासाठी मंजूर पुरवणी मागणीचा निधी ७०% मर्यादेत वितरीत करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यामुळे सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :

वर नमूद केल्याप्रमाणे सन २०१५-१६ मध्ये मंडळ अधिकारी व तलाठी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना दिनांक १ सप्टेंबर, २०१४ पासून अनुज्ञेय करण्यात आलेला कायम प्रवास भत्ता संबधितांना रु.१२७५/- (दैनिक भत्त्यासह) प्रतिमाह या मंजूर दराने प्रदान करण्यासाठी चालू वित्तीय वर्ष सन २०१५-१६ करिता खालील लेखाशिर्षाखाली पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीपैकी ७०% च्या मर्यादेत रु.२५,२०,०४,९००/- (अक्षरी रुपये पंचवीस कोटी वीस लाख चार हजार नऊशे फक्त) निधी खालीलप्रमाणे वितरण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	महसूली विभाग	उपशिर्ष	सन २०१५-१६ पुरवणी मागणी रक्कम रुपये	वित्त विभागाने बी.डी.एस.वर वितरित केलेली तरतूद रुपये
१	कोकण	(२०५३ ०२४२)	६३७१०००	४४५९७००
		(२०५३ ०३१३)	३५००४०००	२४५०२८००
२	पुणे	(२०५३ ०२६२)	११०४५०००	७७३१५००
		(२०५३ ०३३१)	६१६२८०००	४३१३९६००
३	नाशिक	(२०५३ ०२५१)	८६४९०००	६०५४३००
		(२०५३ ०३२२)	५१३०९०००	३५९१६३००
४	औरंगाबाद	(२०५३ ०२९८)	१०८०४०००	७५६२८००
		(२०५३ ०३६९)	६१३६२०००	४२९५३४००
५	अमरावती	(२०५३ ०२७१)	९७८७०००	६८५०९००
		(२०५३ ०३४२)	५६३४८०००	३९४४३६००
६	नागपूर	(२०५३ ०२८९)	७२२००००	५०५४०००
		(२०५३ ०३५१)	४०४८००००	२८३३६०००
		एकूण	३६०००७०००	२५२००४९००

२. सदर निधी पुढील अटींच्या अधिन राहून खर्च करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(अ) सदर कायम प्रवास भत्ता पुढील शासनादेश मिळेपर्यंत जळगाव जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येवू नये

(ब) इतर जिल्ह्यात कायम प्रवास भत्ता संबंधित कर्मचा-यांना अदा करतांना तो दुबार दिला जाणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांनी कटाक्षाने घ्यावी.

३. सदर खर्च "मागणी क्रमांक सी-१-मुख्यलेखाशिर्ष २०५३-जिल्हा प्रशासन-०९४-इतर आस्थापना-०९४(०२) मंडळ अधिकारी व मंडळ निरीक्षक-०१ वेतन" व "मागणी क्रमांक सी-१-मुख्यलेखाशिर्ष २०५३-जिल्हा प्रशासन-०९४-इतर आस्थापना-०९४(०३) ग्राम अधिकारी-०१ वेतन" या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर झालेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.४४९/२०१५/व्यय-९, दिनांक ३/११/२०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०५१३००३१२९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madhav Vitthal Veer

Digitally signed by Madhav Vitthal Veer
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3c0e93ab894790967228875f0b4fd8c2fda8590b77ae2ea700bf19e91a673afc, cn=Madhav Vitthal Veer
Date: 2016.02.05 13:02:27 +05'30'

(डॉ. माधव वीर)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, नागपूर.
३. सर्व विभागीय आयुक्त.
४. सर्व जिल्हाधिकारी
५. संचालक लेखा व कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. वित्त विभाग (व्यय-९)(अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई-३२
१०. कक्ष अधिकारी, ब-१/ब-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. निवडनस्ती, कार्यासन ई-१०.